अॅग्रो प्लॅनिंग

१४

शुक्रवार, २८ मे २०२१

सकाळ अॅग्रोवन

# खरड छाटणीनंतर येणाऱ्या करपा रोगाचे व्यवस्थापन

**द्राक्ष सल्ला**


डॉ. सुजोय साहा, सुमंत कबाडे

महाराष्ट्रातील समशीतोष्ण वातावरणामुळे द्राक्षवेलींची वाढ वर्षभर जोरात होत असते. ही वाढ अशीच होऊ दिल्यास फळधारणेवर विपरीत परिणाम होऊ शकतात. त्यामुळे सामान्यपणे द्राक्ष बागेमध्ये २ वेळा छाटणी घेतली जाते. फळकाढणी झाल्यानंतर लगेच खरड छाटणी घेतली जाते. ओलांड्यावर फक्त एक डोळा ठेवून जुनी काडी पूर्णपणे काढून टाकण्याच्या प्रक्रियेला खरड छाटणी असे म्हणतात. खरड छाटणीच्या व्यवस्थापनावर जवळपास ८० टक्के घडनिर्मिती व चांगल्या दर्जाचे उत्पादन अवलंबून असते. आर्थिक नुकसान टाळण्यासाठी योग्यप्रकारे रोग व्यवस्थापन करणेदेखील महत्त्वाचे आहे.

सध्याच्या वातावरणाचा विचार करता बागेमध्ये कमाल तापमान वाढत असून आर्द्रतेमध्ये घट दिसून येत आहे. अनुकूल हवामानाच्या परिस्थितीमुळे खरड छाटणीनंतर बुरशीजन्य करपा (कोलेटोट्रीकम ग्लेओस्पोरॉइडीस) आणि जिवाणू करपा (झेंथोमोनास कॅम्पेस्ट्रिस विटिकोला) या रोगांचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात आढळतो. या रोगांमुळे द्राक्ष उत्पादनात मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होते. योग्य वेळी आवश्यक असलेल्या बुरशीनाशकांचा वापर केल्यास रोगांचे व्यवस्थापन करणे शक्य होते.



पानांवरील जिवाणूजन्य करपा.



पानांवरील बुरशीजन्य करपा.

## बुरशीजन्य करपा

- द्राक्ष बागेमध्ये करपा रोगाची लागण कोलेटोट्रीकम ग्लेओस्पोरॉईडीस किंवा ॲल्सिनो ॲम्पिलीना या बुरशीमुळे होते.
- या रोगाचा प्रादुर्भाव व जीवनक्रम संपल्यानंतर त्याच भागांवर ही बुरशी सुप्तावस्थेत जाते. पुन्हा अनुकूल परिस्थिती तयार झाल्यानंतर त्याचे बीजाणू तयार होऊन रोगाचा प्रादुर्भाव सुरू होतो.
- साधारणपणे ३२ अंश सेल्सिअस तापमान सलग ३ ते ४ दिवस आणि पाऊस असल्यास रोगाचा प्रसार झपाट्याने होतो. रोगाचा प्रसार वारा, पाऊस या माध्यमामधून होतो.
- या रोगामुळे पानांवर बारीक ठिपके पडतात. ठिपक्यांचा आकार कोनात्मक किंवा गोल आणि कडा तपकिरी रंगाची असते.
- रोगग्रस्त पानावर असंख्य ठिपके येतात. रोगग्रस्त पानांच्या पेशी मरतात व छिद्र पडते. वाढ झाल्यावर एकमेकांत मिसळून संपूर्ण पान करपते. त्यावर सुरुवातीच्या प्रादुर्भावाच्या ठिकाणी छिद्रे पडतात. या सुरुवातीचा प्रादुर्भाव बहुधा कमकुवत कोवळ्या पानांवर होते.
- नवीन फुटींवर जास्त प्रादुर्भाव झाल्यास, शेंड्याचा भाग करपतो. रोगग्रस्त पाने वेडीवाकडी व आकारहीन दिसतात.
- हा रोग द्राक्ष काड्यांवरही आढळतो. सुरुवातीला जांभळट-तपकिरी रंगाचे उभट गोलाकार ठिपके आढळतात. कालांतराने ठिपके एकमेकांत मिसळून ठिपक्यांचा मधला भाग खोलगट होतो.
- फुलोरा असतानाही प्रादुर्भाव झाल्यास, द्राक्षाचा फुलोरा करपून नष्ट होतो. प्रादुर्भाव मण्यावर असल्यास त्या ठिपक्यांचा आकार पक्षाच्या डोळ्यांसारखा होतो. या रोगामुळे मणी तडकण्याचे प्रमाण वाढते.



राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्रामध्ये ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक हे मांजरी वाइनगार्ड (द्रवरूप) आणि मांजरी ट्रायकोशक्ती (भुकटी) स्वरूपात तयार केले आहे.

### व्यवस्थापन

- रोगग्रस्त भाग छाटून नष्ट करावेत. पिकांची काढणी झाल्यावर बुरशीग्रस्त भाग किंवा जुन्या रोगग्रस्त फांद्या नष्ट करून द्राक्ष बाग स्वच्छ ठेवावी.
- पाऊस सुरू झाल्यानंतर जमिनीच्या जवळ मुख्य खोडावरील फुटी किंवा नवीन बागेतील जमिनीवरील खोडांवरची पाने काढून टाकावीत.
- तारांवरून जमिनीच्या दिशेने लोंबत असलेल्या काड्या तारांवरती बांधून घ्याव्यात किंवा खाली लोंबणारी काडीची वाढ १२ ते १३ पानांच्या पुढची असेल तर ती छाटून घ्यावी. यामुळे नवीन वाढणारी पाने व फांद्या मातीपासून दूर राहतील. तसेच मातीमधील रोगाचे अवशेष मांडव किंवा ट्रिलायसिस काड्यांवर सहज पोचत नाहीत.
- वादळी पाऊस असेल तरच चिखलाचे शिंतोडे किंवा पाणी रोगांचे अवशेष पानांपर्यंत पोचवण्यास मदत करतात. हे रोगाचे अवशेष कमी करण्यासाठी दरवर्षी द्राक्ष काढणी झाल्यावर वेलींवरील रोगग्रस्त भागांना जमिनीवर तसेच पडू न देता एकत्रित करून खड्ड्यामध्ये गाडून टाकावे.

**नियंत्रण** : (फवारणी प्रति लिटर पाणी)

- कार्बेन्डाझिम १ ग्रॅम.
- थायोफीनेट मिथाइल ०.७१ ते ०.९५ ग्रॅम.
- मॉन्सून सुरू झाल्यानंतर ट्रायकोडर्मा २ मिलि.
- ट्रायकोडर्मा (द्रवरूप) ५ मिलि प्रतिलिटर पाणी किंवा ट्रायकोडर्मा (भुकटी) १० ग्रॅम प्रति एकर याप्रमाणे ड्रेंचिंग करावे.
- नवीन फुटींवर रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी कार्बेन्डाझिम २ ग्रॅम.

## जिवाणू करपा

(झान्थोमोनास कॅम्पेस्ट्रिस विटिकोला)

- बागेत ओलावा आणि उबदार वातावरण असल्यास रोगाची लक्षणे पानांवर दिसून येतात.
- पानांच्या खालील बाजूस डाग दिसून येतात. कालांतराने हे डाग मोठे होऊन फुटींची वाढ खुंटते किंवा थांबते.
- जास्त प्रादुर्भाव झालेल्या ठिकाणी फुटींची वाढ कमी अधिक होते.
- वेलींमध्ये जिवाणूंचा प्रवेश छाटणी, शेंडा मारणे, घडांची विरळणी तसेच गर्डलिंगच्या वेळी झालेल्या जखमेमधून होते. हे जिवाणू रोगग्रस्त वेलींच्या गाभ्यामध्ये जिवंत राहतात. गाभ्यातून वाहणाऱ्या अन्नरसासोबत ते नवीन, निरोगी फांद्या, फुटी व घडांमध्ये जातात. छाटणीच्या तसेच गर्डलिंगच्या अवजारामार्फत या रोगाचा प्रसार होतो.

### रासायनिक नियंत्रण

(फवारणी प्रतिलिटर पाणी)

- कासुगामायसीन (५ टक्के) अधिक कॉपर ऑक्सिक्लोराइड (४५ टक्के डब्ल्यूपी) (संयुक्त बुरशीनाशक) ७५० ग्रॅम प्रति हेक्टर याप्रमाणे फवारणी करावी.
- या रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी स्ट्रेप्टोमायसीन* देण्याची आवश्यकता नाही.

### व्यवस्थापनातील महत्त्वाच्या बाबी

- एका फांदीवर दोन फांद्या ही खूप दाट कॅनॉपी असून, त्यामुळे रोग वाढण्याची शक्यता जास्त असते. हे टाळण्यासाठी एका काडीवर एक फांदी ठेवावी.
- बाग स्वच्छ ठेवावी.
- ओलांड्यावरून वेलीच्या फांद्या खाली जमिनीला टेकणार नाहीत, याची काळजी घ्यावी.

☎ ०२०-२६९५६००१
(राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, मांजरी, जि. पुणे)

टीप : स्ट्रेप्टोमायसिन हे संक्षिप्त नाव वरील लेखात घेतले असले तरी या प्रतिजैविकातील सक्रिय घटक पुढीलप्रमाणे आहेत. स्ट्रेप्टोमायसिन सल्फेट ९० टक्के अधिक टेट्रासायक्लीन हायड्रोक्लोराइड १० टक्के.

- कीडनाशकांच्या शिफारशी लेबल क्लेमप्राप्त किंवा जॉएंट ॲग्रेस्कोप्राप्त आहेत.
- फवारणीचे प्रमाण हाय व्हॉल्यूम फवारणी पंपासाठीचे आहे.
- खरेदीवेळी पक्के बिल घ्यावे.
- बॅन किंवा 'रेस्ट्रिक्टेड' आहे का पाहावे.
- लेबल क्लेम वाचावेत.
- पुरेशा ज्ञानाशिवाय रसायने एकमेकांत मिसळू नयेत.
- रसायनांचा गट तपासावा.
- पीएचआय, एमआरएल तपासावेत.
- पेरणी वा लागवडीपूर्वी संबंधित बियाणांवर कोणती बीजप्रक्रिया केलेली आहे, हे तपासूनच पुढील बीजप्रक्रिया करावी.


## छोट्या जाहिराती

**बी - बियाणे**

**बियाणे / रोपे विक्री**

हळद बेणे विक्री हळद निकाल ५% च्या वर ७% पर्यंत कर्क्युमिन चे प्रमाण असलेले विविध जातीचे उत्कृष्ट मातृकंद व हळदकुंड हळद बियाणे उपलब्ध. अशायक निंजारी.- ९५०३२१०२७०, मिलन शाह- ९५६१३३०१२८

तुर राजेश्वरी सर्वाधिक उत्तम देणारे वाण म.फु.कृ.वि. संशोधित बियाणे थोडेच शिल्लक संपर्क- ९५६१६२३४९८, ८०८७९५५१११

पेरु सर्व जाती, आंबा, चिकु, लिंबु, सिताफळ, नारळ, शेवगा बी, शोभिवंत झाडे मिळतील. सिंदखेडराजा मो.-९५५२०३०८२६

आमच्याकडे खात्रीशीर गरवी कांदा बी रु. २०००/ किलो प्रमाणे मिळेल. मुर्टी, ता. बारामती. श्री. बनकर, मोबा.९४२०३१९३२७, ९४२३१३१६७५.

जातीवंत मातृ वृक्षांपासून बनविलेली भगवा जातीची दर्जेदार डाळिंब रोपे मिळतील. तुकाराम माळी बैरागवाडी जि. सोलापूर. ९७६६ ६५८५६६, ९८३४३२२४२७.

गांडुळ बीज २५० रु. किलो. गांडुळ खत, टेट्राव्हर्मी, बेडव्हर्मी व्हाश व ओडीशी प्लस जातीचे शेवगा बियाणे मिळेल. ९८९०० ६८११२ / ९४२३७८४७१२

तयार ऊस रोपे मिळतील. फाऊंडेशन नीरा, ८६०३२, फुले-२६५, एमएस-१०००१, को-९००४. मो. ७०२०७०४१८१, ७८७५७०९६७५.

उत्तम प्रतीचे १३०७३ चे ऊस बेणे/ रोप मिळेल. तसेच ८६०३२, २६५ व १०००१ चे रोपे मिळतील. ता. बारामती. फोन: ८४५९११०६९३.

**रोपे / टिश्युकल्चर**

केंद्र व महाराष्ट्र शासन परवाना धारक टिश्यूकल्चर केळी व बांबू रोपे सबसिडीस पात्र, व्हायरसमुक्त खात्रीशीर मिळतील.सीमा बायोटेक कोल्हापूर. ९९२२९२९६९९.

६० ते ७० किलो घड असलेल्या मातृ वृक्षापासून बनविलेली टिश्यु-कल्चर व्हायरस मुक्तजी-९ केळी ची रोपे मिळतील.अण्णा बायोटेक पुणे. मो. : ९०११५३०२४७.

**खते / औषधे**

**खते / औषधे विक्री**

निंबोळी व सर्व प्रकारच्या नैसर्गिक पेंडी, बोनमिल मासळी खतयुक्त ग्रोवेल खत सर्व पिकांसाठी. अभ्युदय बायोटेक ९१५६११६८१५/ ९९७००-३६६१६. वितरक नेमणे.

अमिनोॲसिड ५०% - ८०% सिविड / सिलीका / सिलीकोन पावडर / झिंक / कॉपर/मॅग्नेशियम सल्फेट/नीम/करंजाऑईल/आयपीए/ॲसिटोन/डीएमएफ/संपर्क- आर.जे.के. ८७७९९२२०५४

**जलसिंचन**

**ठिबकसिंचन**

अल्फाप्लास्ट परभणीचे जुने ठिबक देवुन नविन दर्जेदार ठिबक त्वरीत उपलब्ध. शाखा परभणी - ९८२३१७९४५६, टेंभुर्णी ता. माढा - ९९२३१२७७११, लातुर - ९०७५६०१८८४, आर्धापुर - ९९७५७३४७७५, पाथरी - ८८५५८८१३११

**बोअरवेल्स**

'बोरवेलचे पाणी वाढवा' कोरड्या बोरवेलला पुनर्जीवीत करा 'बोरचार्जर' या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने कमी वेळेत आणि किफायतशीर दरात संपर्क- ८५३० ३९०३०३, ९०२२३०६४१२.

**नोकरीविषयक**

**नोकरी देणे**

मार्केटिंग एक्झिक्युटिव नेमणे आहेत. मराठवाडा आणि विदर्भ करिता किमान १ ते २ वर्षांचा अनुभव आवश्यक. शिक्षण ॲग्री. संपर्क- ८९८३७३१००७

**वाचकांसाठी निवेदन**

सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत 'सकाळ' व्यवस्थापन हमी देऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी.
-वरिष्ठ व्यवस्थापक, अॅग्रोवन

**जाहिरातींसाठी संपर्क :**

● पुणे - प्रदिप : ७५०७७७५०३७, संग्राम : ९९५८०९९९९९
● नाशिक - चेतन : ९१६८६६११५८ ● कोल्हापूर - शीतल : ९८८११२९२९३
● मराठवाडा - दत्ता : ८६२४०२३२५६ ● विदर्भ - प्रशांत : ८८८८७१८६००
● अहमदनगर - सचिन : ८८८८९६६५८२ ● खान्देश - चेतन : ९८८११३६०३५
● सातारा - संग्राम : ९९५८०९९९९९ ● सोलापूर - प्रदिप : ७५०७७७५०३७

अॅग्रोवन, सकाळ मीडिया प्रा. लि. ५९५ बुधवार पेठ, पुणे -४११००२. फोन नं. : ०२०-२४४०५८४५
E-Mail : advt.agrowon@esakal.com


Scanned by CamScanner